bluebytes
news that matters

Thursday, January 21, 2010

**Social organisation come ahead to control smoking**

Publication: Arthniti, Edition: Mumbai, Journalist: Bureau, Page No: 15, Location: Bottom-Left, Width(cms): 8, Height(cms): 12, Size(sq.cms): 96

## तंबाखू नियंत्रण अभ्यासावर कार्यक्रम

जरी कामाच्या ठिकाणी (सार्वजनिक ठिकाणी) धूम्रपानास बंदी असली तरी त्याची अंमलबजावणी तेवढ्या प्रभावीपणे होत नाही. हिलिस सेखसरिया इन्स्टिट्युट फॉर पब्लिकहेल्थ या संस्थेने डॅना-फॅर्बर कॅन्सर इन्स्टिट्युट (डीएफसीआय) आणि हार्वर्ड स्कूल ऑफ पब्लिक हेल्थ (एचएसपीएच), बोस्टन यांच्या सहयोगात मुंबईतील कामकरी वर्गाच्या धूम्रपानाबाबत अभ्यास योजना आखली आहे. या योजनेतून मिळालेल्या माहितीचा उपयोग तंबाखूचा वापर कमी करण्यासाठी करावयाच्या नियोजनपर कार्यक्रमासाठी केला जाणार आहे

कामाच्या ठिकाणी होत असलेल्या धूम्रपानाला आळा घालण्यासाठी अमेरिकेमध्ये काही प्रयोग करण्यात आले. जेव्हा कारखान्याच्या व्यवस्थापनाकडून कारखान्यातील अंतर्गत वातावरण बदलण्याबाबत महत्कार्य केले तेव्हा त्याचा चांगला परिणाम दिसून आला. म्हणजे कामगारांना धूम्रपान सोडण्याबाबत मार्गदर्शन करणे, काम करताना उद्भवणारे धोके कमी करणे आणि त्यांच्या मनावरील ताण कमी करणे अशा बाबतीत व्यवस्थापनाने योग्य त्या सुधारणा केल्यास कामगारांमधील धूम्रपानाच्या सवयी कमी होतात, असे दिसून आले आहे. या संशोधनाचा उपयोग भारतातही करता येऊ शकतो. हे दाखवून देण्यासाठी वरील अभ्यास कार्यक्रम आखण्यात आला आहे.यामुळे कामाच्या ठिकाणी धूम्रपानावर नियंत्रण आणून तंबाखूमुक्त वातावरण निर्माण करता येईल, असे मत हिलिस सेखसरिया इन्स्टिट्युट फॉर पब्लिक हेल्थचे संचालक डॉ. प्रकाश सी. गुप्ता यांनी याप्रसंगी बोलताना व्यक्त केले.